महाराष्ट्र शासन
**शासकीय विधी महाविद्यालय**
'ए' रोड चर्चगेट, मुंबई- ४०००२०

दूरध्वनी क्र.- ०२२-२२०४१७०७ ई- मेल- principal@glcmumbai.com

क्रमांक/शाविम/आस्था/२०२६-२७/8437 दिनांक- 15/10/2026.

# सूचना

**विषय : महाविद्यालयातील शासकीय मालमत्तेचा योग्य वापर व जतन करण्याबाबत.**

प्रस्तुत महाविद्यालयातील तीन वर्षीय व पाच वर्षीय विधी अभ्यासक्रमांच्या सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, महाविद्यालयातील वर्गखोल्या, कार्यालय, ग्रंथालय, स्वच्छतागृहे तसेच संपूर्ण परिसरातील शासकीय मालमत्तेचा वापर काळजीपूर्वक व जबाबदारीने करावा.

महाविद्यालयातील वर्गखोल्यांमधील पंखे, विद्युत दिवे व इतर विद्युत उपकरणे वापरात नसताना बंद ठेवावीत. बेंच, खुर्च्या, टेबल, कपाटे, संगणक, स्मार्ट बोर्ड, वातानुकूलित यंत्र, जलशीतक ( वॉटर कूलर) व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर काळजीपूर्वक करावा. तसेच वर्गखोल्यातील बेंचेस भिंती, दरवाजे, खिडक्या, फळे व इतर सुविधांवर लिहिणे, खोडणे, ओरखडे काढणे किंवा त्यांचे नुकसान होईल असे कोणतेही कृत्य करू नये.

महाविद्यालयातील वर्गखोल्या, कार्यालय, ग्रंथालय, स्वच्छतागृहे व परिसराची स्वच्छता राखावी. कचरा निर्धारित कचरापेटीतच टाकावा. पाणी व विजेचा अनावश्यक वापर टाळावा आणि महाविद्यालयातील सर्व सुविधा व साधनसामग्रीचे जतन करावे.

महाविद्यालयातील कोणत्याही शासकीय मालमत्तेचे नुकसान होणार नाही, याची सर्व विद्यार्थ्यांनी दक्षता घ्यावी. महाविद्यालयाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित बाब महाविद्यालय प्रशासनाच्या निदर्शनास आणून द्यावी. महाविद्यालयातील कोणत्याही शासकीय मालमत्तेचे नुकसान करताना विद्यार्थी आढळून आल्यास, झालेल्या नुकसानीची रक्कम संबंधित विद्यार्थ्याकडून वसूल करण्यात येईल. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी शासकीय मालमत्तेचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

सर्व विद्यार्थ्यांनी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करून महाविद्यालयाची मालमत्ता जतन करण्यास सहकार्य करावे.

AVaidya 15/10/26

डॉ. अस्मिता वैद्य,
प्राचार्य,
शासकीय विधी महाविद्यालय,
मुंबई.

प्राचार्य
शासकीय विधी महाविद्यालय
'अे' मार्ग, चर्चगेट, मुंबई-२०.